**नि.दि.दावा क्र. ५५६/२०१९ मध्ये निशानी क्र. २४ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने त्याच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी/ अर्जदारांचे असे कथन आहे की, त्यास कोरोना रोगाच्या दुस-या लाटेत आजाराची लागन झालेली होती. तो अत्यावस्थ असल्याने तो तीन महिने सरकारी दावाखाना, अंबाजोगाई येथे दाखल होता. दवाखान्यातून घरी आल्यानंतरही त्यास कृत्रीम ऑक्सीजनची गरज लागत होती. त्या आजारातून बरा होण्यासाठी त्याला एक वर्षाचा कालावधी गेला. तो अशक्त असल्यामुळे चालूफिरु शकत नव्हता. त्यामुळे न्यायालयात हजर राहून तो वेळेत कैफियत दाखल करु शकला नाही. त्याच्याकडून झालेला विलंब जाणीवपूर्वक केलेला नाही. प्रकरण स्थावर मिळकतीबाबतचे असल्याने प्रकरणात योग्य न्यायदान होण्यासाठी त्याच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्याचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. सबब, सदरचा अर्ज.

३. वादीने अर्जास आक्षेप नोंदविताना नि.क्र. २७ वर म्हणणे दाखल करुन प्रतिवादीने जाणीवपूर्वक कैफियत दाखल करण्यास विलंब केलेला असुन वादीने प्रकरणात दोन साक्षीदार तपासलेले आहेत. वादीला न्यायापासून वंचित ठेवण्यासाठी व प्रकरण प्रलंबीत ठेवण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असुन कैफियत दाखल करण्यास झालेला २ वर्ष २२ दिवसांचा विलंब जाणीवपूर्वक केल्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा व मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त दंड करावा अशी विनंती वादीने केली आहे.

४. उभय पक्षांच्या विद्ववान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

नियमित दिवाणी दावा क्र. ५५६/२०१९
मनोज वि.. सत्यनारायण
सी.एन.आर.क्र.एम.एच.बी.आय१०००२०६९२०१९

५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, प्रतिवादी/ अर्जदाराविरुध्द २०.०१.२०२० रोजी विना कैफियत प्रकरण चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. कोरोना आजाराची लागन व त्याअनुषंगाने टाळेबंदी ही राज्यात मार्च २०२० पासून लागू करण्यात आली होती. प्रतिवादीने तत्पूर्वी त्याची कैफियत दाखल करण्यासाठी कोणत्या कारणामुळे विलंब झाला याचा कोणताही उहापोह अर्जात केला नाही. विना कैफियत आदेश पारीत केल्यापासून तब्बल दोन वर्षांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. जरी असे असले तरी दावा स्थावर मिळकतीशी निगडीत असुन करारपूर्ती करुन देण्याबाबत दाखल करण्यात आला आहे. दावा स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याने त्यामध्ये उभय पक्षाचे हक्कसंबंध गुंतलेले आहेत. अशा परिस्थितीत दाव्याचे गुणदोषावर निराकरण होण्यासाठी प्रतिवादी /अर्जदाराविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन त्याला कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य व न्यायोचित वाटते. परंतु प्रकरण चालविण्यासाठी प्रतिवादीकडून झालेला विलंब नजरेआड करणे योग्य होणार नाही. तो विलंब वादीला पैशाच्या स्वरुपात खर्च देवून भरुन काढता योण्याजोगा आहे. सबब, अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये २०००/- इतक्या खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादीविरुध्द नि.क्र. १ वर झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादीने वादीला सदर अर्जाचा खर्च पुढील तारखेपर्यंत अदा करावा अन्यथा सदरचा अर्ज आपोआप खारीज समजण्यात येईल.

BABASO SANJAY SANKPAL
Digitally signed by BABASO SANJAY SANKPAL
Date: 2022.05.05 15:01:31 +0530

दिनांक ०४.०५.२०२२

( बी. एस. संकपाळ )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 04.05.2022 |
| Transcribed on | : 04.05.2022 |
| Checked & signed on | : 04.05.2022 |

Sd/-

(P.V. Bhosale),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.